नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २६२ | Issue - 262 | वार शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ | Blow- Saturday Date 8 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## लाडकी बहीण योजनेतून ५ लाख लाभार्थ्यांना वगळले

### लाडकी बहीण योजनेवरून आदिती तटकरेंनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी लाभदायक ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या बदललेल्या निकषांची माहिती एक्सवर दिली आहे. या नव्या निकषांनुसार या योजनेतून पाच लाख महिला आता अपात्र ठरणार आहेत. जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेतील लाभार्थी महिलांना दरम हा १५०० रुपये थेट खात्यात दिले जात होते. आतापर्यंत योजनेचे सात हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लवकरच देण्यात येणार आहे.



आदिती तटकरे यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे.

अपात्र ठरविण्यात आलेल्या निकषांप्रमाणे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २,३०,००० महिलांना वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १,१०,००० महिलांना योजनेतून अपात्र ठरविले गेले आहे. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या आणि स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १,६०,००० महिला आहेत. यानुसार एकूण पाच लाख महिला आता अपात्र ठरल्या आहेत.

विधानसभा निवडणुकांआधी जाहीर केलेल्या अनेक योजनांचा मोठा आर्थिक ताण शासकीय तिजोरीवर येत असल्याची ओरड होत होती. यासाठी इतर योजनांचा निधी कमी केला असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या दोन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती.

## जम्मू-काश्मीरमध्ये एलओसीवर पाच पाकिस्तानी दहशतवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



जम्मू : जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दहशतवादी हल्ल्याच्या घटना घडत असल्याचं समोर येत आहे. आता ३ फेब्रुवारी रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्याची माहिती समोर आली होती. या दहशतवादी हल्ल्यात एक माजी सैनिक शहीद झाला, तर त्याआधीही अनेकदा दहशतवादी व भारतीय लष्करामध्ये चकमकीच्या घटनाही घडल्या आहेत. आता जम्मू-काश्मीरमध्ये एलओसीवर पाच पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत असल्याचं समोर आलं आहे.

पाच पाकिस्तानी दहशतवादी एलओसीवरून भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत होते. दहशतवादी घुसखोरीच्या प्रयत्नात असताना भूसुरुंगाचा स्फोट झाला आणि त्यात पाच दहशतवाद्यांचा मुत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकव्याप्त काश्मीरमधून दहशतवादी भारतीय सीमा ओलांडत होते. पण त्याचवेळी भारतीय हद्दीत टाकलेल्या भूसुरुंगावर त्यातील एका दहशतवाद्याने चुकून पाऊल ठेवल्याने भूसुरुंगाचा स्फोट झाला. या स्फोटात पाच संशयित पाकिस्तानी दहशतवादी ठार झाले. ही घटना शुक्रवारी घडली. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

वृत्तानुसार, जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील बटाल सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ पाच घुसखोर घुसखोरी करत होते. या दहशतवाद्यांनी एक आयईडी देखील घेतला होता. दरम्यान, स्फोट झाल्यानंतर पाकिस्तानच्या फॉरवर्ड पोस्टवर उभ्या असलेल्या त्यांच्या साथीदारांनी मृतदेह बाहेर नेला. लष्कराने या घटनेला दुजोरा दिला आहे. ही घटना घडल्यानंतर भारतीय लष्कराकडून शोध मोहीम राबवली जात आहे.

दरम्यान, पंधरवड्यापूर्वी जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) भूसुरुंगाच्या स्फोटात लष्कराचा एक जवान जखमी झाला होता. हा सैनिक कृष्णा घाटी सेक्टरमध्ये गस्त घालणाऱ्या दलाचा भाग होता अशी माहिती अधिकाऱ्यांनी सांगितली आहे.

## राज ठाकरे यांच्या हस्ते हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील तीर्थक्षेत्राच्या ठिकाणापासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर वारकरी भाविक फक्त पर्यटनाच्या सोयींच्या उद्देशाने व सेवेसाठी पंचतारांकितच्या धर्तीवर हे हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी हॉटेल श्रेयस या दोन्हीच्या माध्यमातून पर्यटकांना व यशस्वी भावी भक्तांना राहण्याची व जेवणाची उत्तम प्रकारची सोय श्री दिलीप बापू धोत्रे यांनी करून दिल्यामुळे पर्यटकांची सोय झालेली आहे असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीच्या उद्धाटन प्रसंगी त्यांना आपले मनोगत व्यक्त केली.

हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीच्या उद्धाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर म्हणून असंख्य राजकीय शैक्षणिक नेते मंडळी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. माढा विधानसभेची लोकप्रिय आमदार अभिजीत (आबा) पाटील, व शिवसेनेचे नेते प्राध्यापक शिवाजीराव सावंत, पंढरपूर शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते अनिल सावंत, पंढरपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष नागेश भोसले, सहकार शिरोमणी चे साखर कारखान्याचे चेअरमन कल्याण काळे, माजी नगरसेवक नाना कदम, पंढरपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष हनुमंत मोरे, कोळी महासंघाचे अध्यक्ष अरुण कोळी, माजी नगरसेवक लखन चौगुले, धनंजय कोताळकर, भोसे गावचे युवा नेते राजकुमार टरले, हरिचंद्र तळेकर, व सोलापूर जिल्ह्यातील मनसेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरबीआयकडून व्याजदर कपातीचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या पाच वर्षांत पहिल्यांदाच आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं रेपो रेटमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने याआधीची व्याजदर कपात थेट मे २०२०मध्ये जाहीर केली होती. याशिवाय गेल्या दोन वर्षांत आरबीआयनं व्याजदरात कोणतेही बदल केले नव्हते. आता मात्र आरबीआयकडून व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर करण्यात आल्यामुळे त्याचा शेअर बाजारासोबतच भारतीय बाजारपेठेवर काय परिणाम होतो, यावर अर्थतज्ज्ञांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय मोनेटरी पॉलिसी कमिटी अर्थात सीपीसीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आरबीआयने २५ बेसिस पॉइंटने व्याजदरात कपात केली आहे. त्यामुळे आता व्याजदर ६.५० टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. केंद्र सरकारनं यंदाच्या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केल्यानंतर आठवड्याभरातच आरबीआयनं व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आगामी काळात गृह व वाहन कर्जे स्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**५ वर्षांनी आरबीआयची व्याजदर कपात; गृहकर्ज, वाहनकर्ज स्वस्त होणार**

आरबीआयच्या एमपीसी बैठकीत झालेला हा निर्णय कर्ज स्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत घरासाठी घ्यावे लागणारे कर्ज, वाहनासाठी घ्यावे लागणारे कर्ज यांच्यावरचे व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. अर्थात, ही कर्जे महाग होऊ शकतात. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी या माध्यमातून लोकांच्या




हाती जास्त पैसा शिल्लक राहिल्यामुळे त्यातून गुंतवणूक वाढू शकते, बाजारात पैसा येऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. हा निर्णय जाहीर करताना ठझख चे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले, गेल्या काही वर्षांत या पद्धतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फायदा झाला आहे. विशेषत: करोना काळातील आव्हानांचा भारतीय अर्थव्यवस्थेला सामना करता आला आहे. यानंतर सरासरी महागाईचा दर कमी झाला आहे. व्याजदरासंदर्भातील या धोरणाचा अवलंब केल्यानंतर आरबीआयकडून नियोजित पद्धतीनेच मार्गक्रमण करण्यात आलं, असं ते म्हणाले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांत जागतिक बाजारपेठेत घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाकडे पाहिलं जात आहे. डोनार्ड ट्रम्प यांनी नवे टेरिफ प्लॅन जाहीर केल्यानंतर जागतिक बाजारपेठेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. कॅनडा, मेक्सिको आणि चीनसाठी हे टेरिफ दर जाहीर झाले. त्यापैकी कॅनडा आणि मेक्सिकोवरील टेरिफ दर लागू करण्याची प्रक्रिया एक महिन्यासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, या अनिश्चिततेमुळे डॉलर मोठ्या प्रमाणावर वधारला असून जगातील इतर मोठ्या चलनांनी नांगी टाकली आहे. भारतीय रुपयानं ८७ या आत्तापर्यंतच्या नीचांकापर्यंत घसरण नोंदवली आहे.

दरम्यान, ठझख च्या चझउ बैठकीतील चर्चेनंतर देशाचा आर्थिक विकासदर ६.७ टक्के इतका अंदाजित करण्यात आला आहे. त्याशिवाय, घाऊक बाजारपेठेतील महागाईचा दर हा ४.२ टक्क्यांच्या आसपास राहील, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं आहे.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून उजनी धरणातील जल पर्यटनाच्या अनुषंगाने सविस्तर आढावा** | **अतिरिक्त २०० कोटीच्या निधीची मागणी**

## प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना सन २०२५- २६ सर्वसाधारण अंतर्गत वाढीव निधी देण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/सोलापूर (जिमाका) : राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या राज्यस्तरीय वार्षिक योजनांचा आढावा झाल्यानंतर प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना २०२५ २६ सर्वसाधारण अंतर्गत निधी वाढवून देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्याने अतिरिक्त २०० कोटीच्या निधीची मागणी केलेली असून त्यांना यातील जास्तीत जास्त वाढीव निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी केले.

**■ यावर्षीपासून जिल्हा वार्षिक योजनेतील एकूण निधीच्या एक टक्का निधी दिव्यांगासाठी ठेवण्यात येणार**

**■ जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ सर्वसाधारण अंतर्गत उर्वरित २० टक्के निधी या महिन्यात व २० टक्के निधी मार्च महिन्यात उपलब्ध करून देण्यात येणार**

**■ सोलापूर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ सर्वसाधारण अंतर्गत ८६१.८९ कोटीचा आराखडा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून सादर, यात जिल्ह्यातील प्राधान्याच्या योजना लक्षात घेता या आराखड्यात २०० कोटीची अतिरिक्त निधी मागणी**

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, वित्त व नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, आमदार देवेंद्र कोठे, आमदार नारायण पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, प्रीतम कुंटला यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

वित्त नियोजन मंत्री श्री पवार पुढे म्हणाले की सर्व जिल्ह्यांना निधी वाढवून देण्यात येणार आहे, परंतु सर्व यंत्रणांनी मंजूर झालेला निधी १००% खर्च करण्याबाबतचे योग्य नियोजन करावे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतील मंजूर निधी त्या अंतर्गत प्रस्तावित केलेल्या नाविन्यपूर्ण कामावरच खर्च झाला पाहिजे याबाबत दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसवून घ्यावेत. तसेच यावर्षी




पासून जिल्हा वार्षिक योजनेतील १ टक्का निधी दिव्यांगासाठी ठेवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याप्रमाणेच सोलापूर जिल्हा एकात्मिक प्रारूप आराखड्या अंतर्गत मंजूर केलेल्या २८२ कोटीच्या निधीतून उजनी धरणात प्रस्तावित असलेल्या जल पर्यटन आराखड्याची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्याने जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत अतिरिक्त मागणी केलेल्या २०० कोटीच्या निधीतून जास्तीत जास्त निधी सोलापूर जिल्ह्याला विविध विकास कामांसाठी मिळावा अशी मागणी केली. तसेच सन २०२४-२५ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ६० टक्के निधी प्राप्त झालेला असून उर्वरित ४० टक्के निधी लवकरात लवकर देण्याची मागणी ही यावेळी त्यांनी केली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत ८६१.८९ कोटीचा प्रारूप आराखडा समिती समोर सादर केला. शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला. परंतु

शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक प्रारूप आराखडा अंतर्गत मंजूर २८२ कोटीच्या निधीतून उजनी धरण जलपर्यटन, विनयार्ड पर्यटन, कृषी व धार्मिक पर्यटन अंतर्गत सद्यस्थिती बाबत तसेच पंढरपूर येथे दर्शन मंडप व स्कायवॉक उभारण्यात येणाऱ्या १२९.४९ कोटी रुपयांच्या कामाची सद्यस्थितीची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

जिल्हा वार्षिक योजना- सन २०२५-२६:-

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ६६१.८९ कोटी, यंत्रणांची मागणी - १६१०.९० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - ६६१.८९ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - २०० कोटी, एकूण आराखडा - ८६१.८९ कोटी.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५:- सोलापूर जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ सर्वसाधारण अंतर्गत आज रोजी पर्यंत ६० टक्के निधी उपलब्ध करून दिलेला आहे. उर्वरित ४०% निधी पैकी २०% निधी याच महिन्यात उपलब्ध करून देणार तर उर्वरित २० टक्के निधी पुढील महिन्यात उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिली. तर उपलब्ध झालेला शंभर टक्के निधी सर्व शासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे नियोजन करून खर्च करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

## संपादकीय....

### घुसखोरी वाढली

जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दहशतवादी हल्ल्याच्या घटना घडत असल्याचं समोर येत आहे. आता ३ फेब्रुवारी रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्याची माहिती समोर आली होती. या दहशतवादी हल्ल्यात एक माजी सैनिक शहीद झाला, तर त्याआधीही अनेकदा दहशतवादी व भारतीय लष्कराम ध्ये चकमकीच्या घटनाही घडल्या आहेत. आता जम्मू-काश्मीरमध्ये एलओसीवर पाच पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत असल्याचं समोर आलं आहे. पाच पाकिस्तानी दहशतवादी एलओसीवरून भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत होते. दहशतवादी घुसखोरीच्या प्रयत्नात असताना भूसुरुंगाचा स्फोट झाला आणि त्यात पाच दहशतवाद्यांचा मुत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकव्याप्त काश्मीरमधून दहशतवादी भारतीय सीमा ओलांडत होते. पण त्याचवेळी भारतीय हद्दीत टाकलेल्या भूसुरुंगावर त्यातील एका दहशतवाद्याने चुकून पाऊल ठेवल्याने भूसुरुंगाचा स्फोट झाला. या स्फोटात पाच संशयित पाकिस्तानी दहशतवादी ठार झाले. जम्मू आणि काश्म ीरच्या पूंछ जिल्ह्यातील बटाल सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ पाच घुसखोर घुसखोरी करत होते. या दहशतवाद्यांनी एक आयईडी देखील घेतला होता. दरम्यान, स्फोट झाल्यानंतर पाकिस्तानच्या फॉरवर्ड पोस्टवर उभ्या असलेल्या त्यांच्या साथीदारांनी मृतदेह बाहेर नेला. लष्कराने या घटनेला दुज-ोरा दिला आहे. ही घटना घडल्यानंतर भारतीय लष्कराकडून शोध मोहीम राबवली जात आहे. दरम्यान, पंधरवड्यापूर्वी जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) भूसुरुंगाच्या स्फोटात लष्कराचा एक जवान जखमी झाला होता. घुसखोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असली तरीही त्याला प्रत्युत्तरही आपले जवान देत आहेत.

## केरे गावच्या नूतनीकरण ग्रामदेवता मंदिराचा १५ पासून जीर्णोद्धार सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिपळूण/केतन भोज : गुहागर - चिपळूण तालुक्याच्या मध्यस्थी व निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या केरे गावचं ग्रामदैवत असणाऱ्या पुरातन मंदिराचे नूतनीकरण काम पूर्ण झाले असून मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्तीसंस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवार दि.१५ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी या कालावधीत हा सोहळा पार पडणार आहे.शनि. १५ रोजी नवीन मूर्ती वाजत - गाजत मिरवणूकसह मंदिरात आणणे,रविवार १६ रोजी होम हवन याग व रात्रौ १० वा.केरे ग्रामस्थ यांचे नमन तर सोमवार दि.१७ रोजी नवीन मूर्ती प्राणप्रतिष्ठा व धार्मिक कार्यक्रम, श्री सत्यनारायण महापूजा व रात्रौ ९. ०० वा.रत्नागिरी जिल्ह्यातील लोकप्रिय असणारे हौशी कलाकार नमन मंडळ ( गोळवली - संगमेश्वर ) यांचे नमन सादर होणार आहे.सदर सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आ-वाहन समस्त केरे गाव ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ/ महिला मंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## टाकळीवाडी परिसरात कावीळ रुग्ण वाढले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ परिसरात कावीळ रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.

विशेष करून शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने कावीळ ग्रस्त झालेले आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्राकडून पाणी गरम करून पिण्याचा सल्ला देण्यात आलेला आहे. सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना कावीळ संदर्भात सूचना देण्यात आलेले आहेत.

# आश्रुंचे पाथेय

दुःख या भावनेची व्याख्या अश्रुनेच करता येते का? का जड अंतकरणातील खोल संवेदना यामुळे ही दुःख साठलेल् ते कळते . असे मानता येतेका? असे दुःख समाजात सतत सर्वत्र अविष्कृत होतअसते. दुःखाला आविष्कृत होताना अश्रूंची आक्रोशाची गरज असते का? दुःख याशिवाय आक्रोश व अश्रूशिवाय दुःख दिसत नाही का? या प्रश्नांचा शोध घेणे म्हणजे दुःखाचे आजचे स्वरूप समजून घेण्यासारखे आहे.

दुःखाशी संवेदनेचा संबंध असतो का? दुःखाची अभिव्यक्ती भिन्न भिन्न प्रकारे होत असते का?. अबोला राहणे. शांत राहणे. निशब्द रा-हणे. भावनांचे सर्व प्रकारच्या दमन करणे. आणि आंतरिक अस्वस्थ भावनेचे ओझे बाळगणे ही पण दुःखाचीच अवस्थाअसते. दुःखाला आश्रू आणि हुंदका व आक्रोशाचीच गरज का असते? दुःखही आंतरिक भावना अभिव्यक्त होण्यासाठी विना संकुचित मन हवे असते का?

अशा मनोवस्थेत व वर्तन करणारी व्यक्तिमत्व दुःखाचा आविष्कार कसा करतात? याचा अनेक अंगाने विचार आपण स्वतः करायला हवा. दुःखाची अभिव्यक्ती नैसर्गिक असते. त्यात भाव-नेचा वेग हुंदका आणि अश्रू हे सोबत असतात ,पण याचे नियंत्रण भावनेच्या पलीकडचे बुद्धीने नियंत्रण करता येते. ते केले जात असल्याने धीर गंभीरता प्राप्त होते . याच प्रकारे प्रासंगिक समाज व व्यक्तीला दर्शनीक पने या सर्वांच्या समोर आपल्या भावनांचे कड नियंत्रित करता येतात . ही एक विवेकाची नियंत्रण अवस्था आहे. पण या विवेकाचे महत्त्व भावनेच्या प्रांजल संवेदनेपेक्षा मोठे असत नाही. हे महत्वाचे आहे. असे ही त्या व्यक्तीस प्रतीत होत नाही. नैसर्गिकता आणि अश्रू आवेग आणि अश्रू भावनांचा दाटून आलेला जड असा आंतरिक दाब हा माणसांना अश्रू कडे रूपांतरित करतो.

अश्रूचे आणि माणसांचे नाते हे कधीच दूर होणार नाही . हे वास्तव आहे. प्रत्येक व्यक्तीस होणारे दुःख गूढ (कारण) मुळात संवेदनेने दुःख होते. ती व्यक्ती तो समाज यांच्या दीर्घकालच्या किंवा अल्पकालीन सहभागातून सह वेदनेचे नाते संस्कारातून ते विकसित होते. तेच दुःख अभिव्यक्तीचे कारण असते.दोन्ही व्यक्ती दोन्ही प्रकारचे समाज गट जेव्हा मूल्य हा भाव एकत्रित जगणे जगत राहतात, तेव्हा त्यांची साथ निष्ठा पुढे जाणे चालू राहते. दुःखाची साक्षरता त्या दोन व्यक्तींना प्राप्त झाल्यामुळे अश्रूंची सहजता त्या दोन व्यक्तींच्या नात्यांमध्ये प्रतीत होते अश्रूंचे पाथेयही जीवनाची फार मोठ्या निष्ठेची गोष्ट आहे. ती व्यक्ती जीवनात व सार्वजनिक जीवनात ही पाथेय मानले जाते अश्रूंची प्रचिती अविष्कार आणि त्याचे महत्त्व हे घ्या समाजाला कळलेले असते .तो समाज निरक्षर असला तरीही त्यांच्याम धील आंतरिक जाणीव यांची समृद्धी त्यामध्ये खूप झालेले असते. म्हणूनच अश्रूच्या वाटा निरंतर समाज जीवनाच्या सोबत वाहत आलेल्या आहेत. चालत आलेले आहेत. अश्रूंच्या वाटा ही मानवी संस्कृतीची वाट आहे. मानवी संस्कृती अश्रूंच्याम ुळे सशक्त होते. संस्कृती आणि अश्रू ही एक म ानवी सध्या काय दोन नात्यांचे निष्ठायुक्त व समृद्ध जगणे या दोन गुणांच्या मुळे विकसित होते प्रतीत होते. आविष्कृत होते. नाती ही संवेदना आसते नाती ही कृतज्ञता असते नाती हे सहकारी असते. नाती हे कर्तव्य असते. नाती ही दुःखाची साथ असते. नाती हा अंतरीक गुढ असा आकर्षणाचा प्रवास असतो.

नात्यांच्या मध्ये आई-वडील पत्नी भाऊ मुले आणि ही नात्यांची अनेक वर्तुळे माणसांना समृद्ध नाते जीवन प्राप्त करून देतात, पण या नात्यांच्या वर्तुळात भावना साक्षरता आणि नैतिकता यांचा चालत आलेला वारसा जितका बलिष्ठ असेल की नाती दृढ होतात. जेव्हा नात्यांच्या मध्ये निरपेक्षता असते तेव्हा नाती सुदृढ असलेली प्रतीत होतात भौतिकता स्वार्थ स्वतंत्र संपत्ती संचय आणि स्वप्रतिष्ठेचा अहंकार हा सुद्धा नात्यांच्या मध्ये दुष्परिणाम घडवतो नात्यांच्या मधील समानता ही अट असायला हवी नात्यांच्या मधील ज्येष्ठत्व जपायला हवे, नात्यांच्या मधला आदर हा कळायला हवा. हे कळत नसेल आणि याहीपेक्षा स्वयं स्वार्थ जेव्हा टोकाला जातो तेव्हा नात्यांच्या मधील या साध्या भोळ्या निष्पाप माणसांना सहज अधिकार शाहीने वापरून नाती ही कटू असूनही तशीच पुढे सहन करत राहतात. अनेक कुटुंबे निभावून नेहत असतात. नात्यांच्या मधील ही कटूता याची कारणे नाहीसे करण्याचे तात्कालीक प्रयत्न दबावातून नम्रतेतून होत नाहीत, आणि त्यामुळेच नात्यांच्या मधील हे सगळे दोष-ास्पद वर्तन सर्व पातळीवरचे नाहीसे होत नाही नात्यांच्या मधील स्पष्टता नात्यांच्या मुलीला आदर खुलेपणा आणि व्यवहारातील प्रामाणिक वर्तन हे सर्वांनी काळजीपूर्वक निभावण्याची गोष्ट असते करावयाची गोष्ट असते पण नात्यांच्या मध्ये इतरांच्या अज्ञान त्याची भावो व्यवस्था त्याचे याचाच फायदा ज्येष्ठ मंडळी घेत असतात आणि याला ते कर्तुत्व मोठेपणा ज्येष्ठत्व म्हणतात.

समंजसपणा शहाणपणा पोक्तपणा व मॅच्युरिटी आहे का? प्राप्त झाली आहेका? त्यावर माणसांचे सार्वत्रिक वर्तनामध्ये सहज ओल्या डोळ्यांनी वर्तन हे मोठ्या प्रमाणात स्त्रियांच्या मध्ये आढळून येते. गावागाड्यातील जीवनात याचा उत्स्फूर्त आविष्कार आढळून येतो. माणसांचे जगणे बोलणे रडणे हसणे ही एक सहज उत्स्फूर्त अभिव्यक्ती आहे.

वास्तवता खरे खोटेपणा नात्यांच्या मधील दांभिकता ही जेव्हा कळू लागते .तेव्हा दुबळ्या अश्रूंचे वर्तन करणे .ही पण दुबळी वर्तन पद्धती आहे .असे वाटून राहते पण अश्रू हा अविष्कार नाही. सामाजिक प्रतिष्ठा निर्भयता वर्तनातील कठोरता यामुळे अश्रूला नियंत्रित करणे संयत करणे अनेकांना साध्य होते .स्त्रियांच्या मध्ये सहजता भावनिकता अश्रूंची उत्स्फूर्तता ही त्यांची जैविक नात्यांची वैशिष्ट्य आहेत. स्त्रिया अश्रूच्या संस्कृतीच्या वाहक आहेत. जीवनाच्या दुःख भावना कष्ट आठवणी अश्रू या सर्वांचे सतत ओझे श्रेया बाळगत असतात. पुरुष त्या तुलनेने व्यवहार निर्भयता पोक्त पणा बाळगून सार्वत्रिक जीवनामध्ये दुःख पासून पुढे जावयाचे असते असे ग्रहित धरून वागतात. असे दर्शन वर्तन करणे यासाठी पुरुषांच्या वर्तनात अश्रूंचा वावर आणि आढळ आढळून येत नाही. व्यक्तीच्या नात्यात आंतरिक असलेली आसक्तीआणि अश्रू हे खूपच एकमेकांशी संलग्न असतात. अश्रूच्या या जीवन अस्तित्वाचे महत्व मानवी संवेदना दुःखाचा गहिवर दुःखाचा सहभाग आणि एकूणच अस्सल भावनांचा आविष्कार यासाठी हे सर्व वर्तन सहज उत्स्फूर्त होणे ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. असायला हवी पण माणसाची सभ्यता माणसाची कठोरता माणसांची व्यवहारिकता ही दुःखाला नियंत्रित करते. संवेदनेला आवर घा-लते, आणि माणूस संवेदना बाळगणे दुःख अश्रू गाळणे हे अगदी दुबळेपणाचे लक्षण मानू लागतं आणि त्यातूनच आंतरिकआसलेल्या उत्स्फूर्त अविष्काराला प्रतिबंध होत राहतो.

आक्रोश विरहित दुःख हाही दुःखाच्या अभिव्यक्तीचा प्रकार असू शकतो. हा आता सहज रूढ होऊ लागला आहे. नात्यांच्या मधील विवेक नात्यांच्या मधील सामंजस्य आणि आधार देण्याची ज्येष्ठत्वाची अधिकार प्राप्त नाती ही खूप महत्त्वाची असतात . आता आधुनिक शिक्षित शहरी समाज जीवनात हे अश्रूंचे आकाश पाताळ असे वर्तन कमी प्रमाणात आढळून येते. म्हणून समाज रूक्ष झाला आहे असेही म्हटले जाते परंतु बदलती अश्रूची अविष्कार वृत्ती आणि पद्धती हा त्यातील फरक आहे. माणूस अस्तित्वाच्या शेवटपर्यंत अश्रूंची सोबत अश्रूंचे महत्त्व हे कायम प्रत्येक व्यक्तीने ओळखायला आणि जपायला हवे तसे सहज उत्स्फूर्त स्वयंप्रेरणेने नैसर्गिक रित्या वर्तन ही करायला हवे, जीवनात भावनांची रुक्षता जेवढी वाढेल तितके अश्रूचे निर्मूलन कमी जास्त प्रमाणात होत राहील. हे पूर्णतः होणे नाही. दुःख आणि अश्रू नात्यांचे अस्तित्वात असणे आणि अश्रू हे सेवा सोबत असतात. समाजाच्या सभ्यतेवर संस्कारावर मूल्य आणि त्यावर समर्पण आणि सेवावृत्तीवर अश्रूंचे अभिव्यक्ती वेगवान पद्धतीने होत राहते पण यासाठी अजूनही एका कृतज्ञ पूर्वस्मरणाची सतत आठवण त्या दोन नात्यांच्या मध्ये असायला हवी असते. पूर्वस्मरण आणि कृतज्ञता हा एक जग-लेला जीवनकाळ असतो. तो सहयोग असतो त सहकार्य असते.

कितीतरी जीवनातील व्यक्तींच्या नात्यांची वर्तुळे या सर्व दुःख आणि अश्रूंच्या साह्याने जड होत राहतात. आई हा तर अश्रूचा मूल स्त्रोत असतो सार्वजनिक जीवनातील विचारांच्या नात्यातून दृढ झालेले संबंध ही नाती सुद्धा अश्रूंना वाट मोकळी करून देतात. हे विचाराच्या अश्रू मूल्यांचे आश्रु, समर्पणाच्या आश्रु ,त्यागाचे अश्रू असे भिन्न भिन्न आठवणीतून अभिव्यक्त होतात. हे त्याच वेळेला कळत नाही आंतरिक नैसर्गिक वर्तनाच्या मुळे हे सहज होत राहते समाज जीवनात हे सतत व्हायला हवे समाज मृत्यूचे दर्शन घेताना नेहमी या सर्व नैसर्गिक भावनांचे सतत वर्तन करताना वावरताना आढळून आला पाहिजे यामध्येच आपणा सर्वांना आपल्या छोट्या मोठ्या दुःखाचे अनुभव घेता येतात ते जपता येतात. त्यातील आपले निष्ठावर्तन ही एक स्वतःसाठीची प्रामाणिक वर्तनाची प्रचिती कितपत आहे हेही तपासता येते किबहूना हे तपासन्याची गरजही नसते.

जीवनातील अश्रूचे मोल असे अनमोल असते. तसेच ते मातीमोलही असते .आता रूक्ष समाज निर्दय समाज कठोर समाज संवेदनहीन समाज जवळ आला आहे ना? त्यांच्यामध्ये सुद्धा असे अनुभव अनेकांना ते येत राहतात अशा कालखंडातून समाज जीवन पुढे जात असताना अश्रूच्या अस्तित्व कोणत्या स्वरूपात असणार आहे. विसरणे व्यर्थ आश्रु गाळणे भावूक होंने हे चूक आहे असा माणसांचा माणसांना संदेश असतो. शहाणा विचार असतो . हा विचार पुढे ही असणार आहे. तो रुजत राहत आहे आणि म्हणूनच माणसांच्या अश्रूचे पुढे चालत राहणे हे आधुनिक उत्तर तंत्रज्ञान उत्तर काळातील एक कोरड्या डोळ्यांची संवेदनाअसेल का? तेआश्रू हरवलेले कोरडे शब्द असणार आहेत अर्थहीन सांत्वनाचे वर्तन नित्य पुढे चालू असणार आहे. आजच्या वर्तनातील रुक्षता ही सुद्धा एक स्वयंकेंद्री अलिप्त वर्तनाची परिनीती असते.

व्यक्ती कुठेही असो जिथे जिथे ती संवेदनेने अभिव्यक्त होते तिथे सहजअश्रू गाळणे हे मौलिक ठरते. न जात धर्म, नाती, भाषा, पंथ हे सर्व विसरून जिथे वेदनेशी नाते जुळते. तिथे अश्रूंना प्रतीत होणे हेच मानवी अस्तित्वाचे जिवंत असणारेश्रेष्ठ वैशिष्ट्य ठरते. अन्यथा यंत्र वत म ाणसांच्या जगाकडे निघालेली मानव जात अश्रूला पूर्ण विराम देऊन पुढे जाणार आहे का काय? असा प्रश्न व्यर्थ ठरेल हा प्रश्नच उपस्थित होणार नाही. मानवी अस्तित्वाच्या नामोनिशानी बरोबर अश्रूंची नामो निशाणी असणारच आहे . एवढेच आपल्या सर्वांच्या आईसाठी जशास सुरू रा-हतात. तसेच २६ जानेवारी २०२५ रोजी माझी आई श्रीमती सोनुबाई पांडुरंग राऊत वय वर्ष ९४ हिचे एहलोकसोडून जाण्याच्या १२ दिवसाच्या घटनेवरून त्या उत्फुर्त दोन वेळच्या अश्रुनीच म ला आश्रु बाबत. असा विचार करायला शिकवले म्हणून अश्रूच पाथेय स्वतःला समजून घेण्यासाठी शब्दबद्ध केले आहे पण अश्रू तरीही न कळणारेच राहतातहे ही खरेच

**लेखक - शिवाजी राऊत**
**सातारा**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मालधक्का येथील आंबेडकर भवनासाठीच्या जागेसाठी एकत्रित या

**दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांच्या कडून जाहिर आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (अजिंक्य मस्के) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मालधक्का येथील आंबेडकर भवनासाठी असण-ारी दोन एकर जागा बांधकाम व्यवसायिकाच्या घशात घालण्याचे काम शासन, प्रशासनाने केल्याम ुळे अनेक वर्षांपासून पुणे शहराम ध्ये डॉ .बाबासाहेब आंबेडकरांचे एकही उचित असे स्मारक नसल्यामुळे आंबेडकर भवनाला लागून असलेली पीडब्ल्यूडी ची जागा भवनासाठी मिळावी म्हणून गेल्या पंचवीस वर्षापासून कागदोपत्री संघर्ष चालू होता. परंतु त्यास अपयश आले आहे. २००० सालापा-सून पुणे महानगरपालिकेने तसा ठराव पास केला होता. त्यानंतर २०१६ म ध्ये मुख्यमंत्री यांनी देखील ही जागा आंबेडकर भवनासाठी देण्यात यावी असा शेरा मारला होता. परंतु आता विधानसभेच्या आचारसंहितेच्या अगोदर शासनातील काही राज्यकर्त्यांनी ५०० कोटी ची जागा अवघ्या ६० कोटी मध्ये खाजगी बांधकाम व्यवसायकाला दिली आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. आणि आंबेडकरी चळवळीने केलेल्या मागणीला काळिंबा फासण-ारी आहे म्हणून ही आमच्या अस्मितेची लढाई लढण्यासाठी व जन आंदोलनाची भूमिका घेण्यासाठी,आंबेडकरी चळवळीतील सर्व पक्ष, संघटनातील पदाधिकारी, कार्यकर्ते व जनते-ने या मोर्च्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे मतभेद मनभेद अनेक गटातटाचे पायताने बाजूला ठेवून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य स्मारकासाठी एकत्रित येऊन लढा उभा करूया आणि त्याचाच विचार करण्यासाठी आंबेडकरी जनतेच्या एकीसाठी या महत्वपूर्ण मोर्च्या आयोजन करण्यात आले असून आपली उपस्थिती अत्यंत महत्वाची असून दिशा देणारी नक्कीच असेल यामध्ये शंकाच नाही मला खात्री आहे आपण मोठ्या संख्येने उद्या ०७/०२/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता पुणे जिल्हाधिकारी कार्यालया समोर या मोर्चेस हजर राहावे असे आ-वाहन दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांनी केले आहे .अधिक माहिती साठी दलित पँथर कार्यालयीन सचिव अजिंक्य मस्के यांच्याशी संपर्क करावे.



### ११० कलावंतांनी करून घेतली आरोग्य तपासणी

### मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

## कलावंतांनी आरोग्याच्या तंदुरुस्तीबद्दल दक्ष असावे : प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : चित्रपट व नाट्य कलावंतांना आपला अभिनय उत्तम व्हावा असे वाटत असते. ते रंगीत तालीम व प्रयोग सादर करण्यात व्यस्त असतात. त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. म्हणून त्यांनी नियमित वैद्यकीय तपासण्या करून घ्याव्यात. डॉक्टरांचा सल्ला अमलात आणावा. अनेक प्रतिष्ठित कलावंतांनी आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांचे अकाली निधन झाले आहे म्हणून कलावंतांनी नियमित पुरेसा व्यायाम, पुरेशी




विश्रांती, सकस आहार, व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे असे प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरचे अध्यक्ष व माजी आमदार प्रकाश यलगुलवार हे होते.

प्रारंभी नटराजमूर्तीची पूजा करून दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांनी केले.

ते बालरंगभूमी परिषद, शाखा सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, लिमये अ‍ॅक्युप्रेशर व अ‍ॅक्युपंक्चर केंद्र, अवधूत डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील कलावंतांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब सोला-पूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी, पराग कुलकर्णी, डॉ. प्रांजली मार्डीकर, नॅबचे पदाधिकारी डॉ. किशोर देशपांडे, बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेचे उपाध्यक्ष सौ अर्चना अडसूळ, सल्लागार ज्योतिबा काटे, कोषाध्यक्ष सुनंदा शेंडगे, कार्यकारणी सदस्य सुभाष माने, सुमित फुलमाडी, अशोक किल्लेदार, किरण फडके, मिलिंद पटवर्धन, संस्थेचे सचिव शशीभूषण यलगुलवार, प्राचार्य नरसिंह आसादे, एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

या शिबिरात सोलापुरातील कलावंतांची शुगर तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व्यंकटेश कंची यांनी केली, ब्लड प्रेशर तपासणी, जनरल चेकअप करून उपचार डॉ. योगेश पल्लोलू यांनी केली. क्युप्रेशर व अ‍ॅक्युपंक्चर चेकअप व मार्गदर्शन डॉ. मुकुंद लिमये यांनी केले. दंत रोग तपासणी डॉ. प्रांजली मार्डीकर यांनी केली. तपासणी शिबिरात ११० कलावंतांनी तपासणी करून घेतली.

सूत्रसंचालन अर्चना अडसूळ यांनी केले तर आभार परिषदेचे सुभाष माने यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### साखर पेठेतून दुचाकी लंपास, गुन्हा दाखल




सोलापूर, (प्रतिनिधी) : साखरपेठ येथील गणेश शॉपिंग सेंटर येथील पार्किंगच्या ठिकाणी दुचाकी क्रमांक.१३. डीए.३३९६ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने हॅण्डल लॉक तोडून चोरून नेल्याची घटना २ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी विशाल सुभाष चव्हाण (वय-४०,रा.मधला मारुती,पूर्व मंगळवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नदाफ हे करीत आहेत.

# पंढरपूर-मंगळवेढ्यासाठी उद्योग द्यावेत : आ. आवताडे

## आ. आवताडेंकडून मुख्यमंत्र्यांकडे मागणी; जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रात अव्वल गुंतवणूक प्राप्त केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे आ. आवताडेंकडून अभिनंदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कुशल नेतृत्वाखाली दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने ऐतिहासिक गुंतवणूक प्राप्त केली आहे. दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फॉर्म २०२५ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याने तब्बल १५.७० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यासाठी प्राप्त केली आहे ही ऐतिहासिक गुंतवणूक महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या कर्तुत्वाने देशातील इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक जास्त गुंतवणूक प्राप्त केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करण्याचे पत्र पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाच्या वतीने देऊन काही उद्योग पंढरपूर व मंगळवेढा औद्योगिक वसाहतीमध्ये देण्यात यावेत अशी मागणी करत मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक महाराष्ट्रासाठी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांनी दिलेले या पत्रात असे म्हटले आहे की माझ्या मतदारसंघात नुकतेच आपण पंढरपूर एमआयडीसी मंजूर करून दिली आहे सध्या त्या जागेची मोजणी चालू असून लवकरच ती जागा फिक्स होणार आहे त्यामुळे त्या ठिकाणी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार असून आपण त्या ठिकाणी नवीन उद्योगासाठी कंपन्यांशी बोलून पंढरपूर साठी काही उद्योग पाठवले तर येथील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे त्याचबरोबर मंगळवेढा एमआयडीसी बाबत ही मी नुकतीच बैठक घेऊन येथे जागा घेऊन उद्योग सुरू करण्यात व्यवसायिकांना नोटीसा काढून तात्काळ उद्योग सुरू करा अन्यथा त्यांच्या जागा काढून घ्या अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या असून मंगळवेढा येथील औद्योगिक वसाहतीमध्येही उद्योगधंद्यासाठी जागा उपलब्ध आहेत येथेही तात्काळ औद्योगीकरणाच्या दृष्टीने नवीन उद्योगांसाठी काही उद्योगपतींना आपल्या माध्यमातून प्रोत्साहित केले तर अनेक उद्योगधंदे येथे येऊ शकतात त्यामुळे नवीन गुंतवणूकदारांना आपण पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील असलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये भविष्यात आपल्या माध्यमातून मोठी परकीय गुंतवणूक करून मोठे उद्योग स्थापित करत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याल अशी अशा व्यक्त करतो अशा आशयाचे शुभेच्छा संदेश पत्र आमदार समाधान आवताडे यांनी देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून देऊन त्यांचे अभिनंदन केले.

# कर्मयोगी इन्स्टिट्यूट पॉलीटेक्निकलचे स्पोर्ट्‌समध्येही वर्चस्व कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट असोसिएशन आयोजित सीजन खो-खो स्पर्धेमध्ये कर्मयोगी पॉलिटेक्निकल विद्यार्थ्यांनी सलग तिसऱ्या वर्षीही आपले वर्चस्व कायम ठेवून विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यामध्ये शिवाजी पॉलिटेक्निकल कॉलेज या संघावर एक डाव दोन गुणांनी विजय संपादित केला आहे. या स्पर्धा स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सोलापूर येथे पार पडल्या.




यामध्ये कर्मयोगी पॉलिटेक्निकल कॉलेजचे खेळाडू रामचंद्र ढोबळे, गौरव खेडेकर, रितेशपाटील, ओम उपाशी, प्रवीण उपाशी, चैतन्य वाघ, सिद्धेश्वर जवळेकर अमोल राज खेडकर प्रसाद जाधव चेतन कदम श्रीराम कुलकर्णी प्रेम धांडे कृष्णा मोरे प्रफुल्ल पवार यांनी चमकदार कामगिरी केली करत यश संपादन केले आता कर्मयोगी संघाचे महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे गव्हर्मेंट पॉलिटेक्निकल कॉलेज येथे झालेल्या हॉलीबॉल मुलींच्या स्पर्धेमध्ये कर्मवीर कॉलेजच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले आहे. आरती जाधव वैष्णवी जाधव कोमल पवार पुष्पांजली केसरकर मुक्ता शिंदे, आकाश पाटील गौरी वराडे गौरी होनमाने यांनी सहभाग नोंदवला.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त मा श्री रोहन परिचारक कर्मयोगी पॉलिटिकल कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर अजित कणसे, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील, रजिस्टर गणेश वाळके, यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक विजय साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

# ह.भ.प.सुरेशसिंग परिहार महाराज यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : वागदरी ता. तुळजापूर येथील ग्रामदैवत संत श्रेष्ठ सद्गुरु भवानसिंग महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी तथा भवानसिंग महाराज भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. सुरेशसिंग उमरावसिंग परिहार महाराज यांचे दि.६ फेब्रुवारी २०२५ रोजी अल्पशा अजाराने दुःखद निधन झाले.

ह.भ.प सुरेशसिंग परिहार महाराज हे शांत, संयमी, अत्यंत प्रेमळ व मनमिळावू स्वभावाचे ज्येष्ठ वारकरी



होते.त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदायामध्ये खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे. गावातील सर्व सामाजिक धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा हिरीरीने सहभाग असायचा.

दिनांक ६/ २ /२०२५ रोजी सायंकाळी ठीक ६:०० वाजता वागदरी येथील स्मशानभूमी त्यांच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार करण्यात आले.

या प्रसंगी उपस्थित शोकाकुल जनसमुदायानी त्याना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी सुना जावाई नाथ जावाई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# शासकीय दप्तर नष्ट केल्याप्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे : इंदापूर वरकुटे खुर्द (ता. इंदापूर) येथील ग्राम पंचायतीचे सन १९८६ ते २००० या वर्षातील शासकीय दप्तर नष्ट केल्याप्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मल्हारी येदु झगडे व शिवाजी दशरथ यादव, अशी गुन्हा दाखल झालेल्या तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचाची नावे असुन याबाबत इंदापूर पंचायत समिती येथे कार्यरत असलेले विस्तार अधिकारी भिवा ज्ञानदेव काळे यांनी फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी नुसार वरकुटे खुर्द येथील ग्राम पंचायत दप्तर चौकशीवरून व सुनावणीवरुन तत्कालीन ग्रामसेवक मल्हारी येदू झगडे (रा. झगडेवाडी, ता. इंदापूर) यांनी २१ एप्रिल १९८६ ते ३१ मे २००० या कालावधीत ग्रामसेवक असताना, तसेच तत्कालीन सरपंच शिवाजी दशरथ यादव यांनी ५ ऑगस्ट १९८९ ते २१ ऑगस्ट २००० या कालावधीपर्यंत सरपंच असताना ग्रामपंचायत नमुना ८ हा शासकीय दस्तऐवज आहे, हे माहीत असताना ते ग्रामपंचायत कार्यालयात न ठेवता संगनमताने, विश्वासघाताने शासनाची व मुळ अर्जदार यांची फसवणूक करून पुरावा नष्ट केला.

यामध्ये सन १९९५ पूर्वीचे वरकुटे खुर्द येथील ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत नमुना ८ हे रजिस्टर गहाळ करून शासनाची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे इंदापूर पोलिस ठाणे येथे या दोघांविरुद्ध शासनातर्फे फिर्याद देत गुन्हा दाखल करणात आला आहे.

# भारतीय संविधान घराघरापर्यंत पोहोचले पाहिजे : डॉ. शिवाजी वीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या, राज्यशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवा निमित्ताने भारतीय संविधान या विषयावर एक दिवशीय कार्यशाळाचे आयोजन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . जीवन सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते यावेळी बोलताना विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांनी वरील मत व्यक्त केले.




या कार्यशाळेत राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित पोस्टर प्रदर्शन केले.

कार्यशाळेची सुरुवात संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करून झाली.

डॉ. शिवाजी वीर म्हणाले की,' भारताचे संविधान हे जगाला आदर्श ठरेल असे संविधान असून ते घराघरापर्यंत पोहोचले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने संविधानानुसार जगले पाहिजे. आपल्या संविधानामध्ये प्रत्येक व्यक्तीला समान मूल्य दिलेले आहे. जात, धर्म, वंश ,भाषा, प्रदेश अशी सर्व विविधता असून देखील आपल्या सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याची किमया केवळ संविधानातच आहे. या संविधानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक व्यक्तीला समजावून सांगितले पाहिजे त्यासाठी संविधान घराघरापर्यंत पोहोचले पाहिजे.

डॉ. प्रज्ञा लामतुरे म्हणाल्या की,' प्रत्येक विद्यार्थ्याने संविधान वाचले पाहिजे ते समजून घेतले पाहिजे आणि ते आचरणात आणले पाहिजे. हीच एक उत्कृष्ट आचारसंहिता आहे. आपल्या संविधानामध्ये लोकशाहीवादी, समतावादी, मानवतावादी, व्यक्तिवादी आणि सहभागीवादी अशी सर्व प्रकारची मूल्य अंतर्भूत आहेत. त्यामुळे आपले संविधान प्रत्येक व्यक्तीला व्यक्ति मत्व विकासाची समान संधी देते.



डॉ. भिमाजी भोर, डॉ. भरत भुजबळ यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिगंबर बिरादार यांनी केले. प्रास्ताविकामध्ये डॉ. बिरादार यांनी संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले प्रत्येक विद्यार्थ्याने संविधानवादी बनले पाहिजे. संविधान हा आपल्या देशाचा आधारस्तंभ आहे. जगभरच्या लोकशाही व्यवस्था कोसळत असताना भारताची लोकशाही ही जगातली सर्वश्रेष्ठ व सर्वात मोठी लोकशाही म्हणून खंबीरपणे जगाचे नेतृत्व करीत आहे याचे गमक भारतीय संविधानात आहे.

डॉ. तानाजी कसबे, प्रा. श्याम सातार्ले, डॉ.महंमद मुलाणी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टरचे डॉ. सुरेंद्र शिरसट व डॉ. शीतल पवार यांनी परीक्षण केले. सूत्रसंचालन प्रा. गणेश मोरे यांनी केले. आभार प्रा. नम्रता निंबाळकर यांनी मानले.

राज्यशास्त्र विभागातील प्रा. गणेश मोरे, प्रा नामदेव पवार ,प्रा. नम्रता निंबाळकर यांनी ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला.

# स्त्री रूग्णालय लातूर येथे माता रमाई यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते उमाताई आदमाने शेखर भैया कांबळे यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कार्यक्रमात उपस्थित वाहतूक नियंत्रण शाखेचे मा. PI पोलीस निरीक्षक गणेश कदम साहेब वैद्यकीय अधीक्षक डॉ रवींद्र भालेराव साहेब, डॉ सोनाली केंद्रे डॉ शेंडगे मॅडम



यांच्या हस्ते त्याग माता मातारमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यांच्या जयंतीदिनी जे मुलगी जन्माला आली त्या मुलींना चांदीची चैन करून व हॉस्पिटलमध्ये फळ वाटप करून अभिवादन करण्यात आले. अँड सुनील मस्के अजय कांबळे, रत्नमाला गोमसाळे, सुमेघ सूर्यवंशी, कांता सुरवंशी, अशोक कांबळे, अजय अंकुशे, आत्माराम गोमसाळे, ओमकार आदमाने, AK कांबळे अतुल मांदळे यावेळी भीमसैनिक भीमकन्या उपस्थित होते.

## तहसीलदार जिवन बनसोडे यांनी वाळुमाफियांचे कंबरडे मोडले

### चार बोटी केल्या नष्ट

# उजनी धरणात वाळू माफियांवर मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : आज दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा प्रशासनाच्या मदतीने इंदापूर तालुक्याचे तहसीलदार श्री जीवन बनसोडे यांच्या नेतृत्वात महसूल यांच्या पथकाने उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील सरडेवाडी व वनगळी येथे पाठलाग करून वाळू माफियांच्या ४ बोटीं पकडल्या व त्या सर्व बोटी बुडवून नष्ट केल्या.

सदर कारवाई मध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार श्री अविनाश डोईफोडे, इंदापूर मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर





शिंदे, काठी मंडल अधिकारी श्री मल्लाप्पा ढाणे, ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, संदीप मैलागिर, प्रताप गायकवाड, राजाभाऊ पिसाळ, अमोल हजगुडे, भास्कर घोळवे, तहसील शिपाई संग्राम बंडगर, पोलीस पाटील सुनील राऊत, प्रदीप भोई, अरुण कांबळे , विजयकुमार करे व आप्पा गायकवाड तसेच पोलीस कर्मचारी लक्ष्मण सूर्यवंशी व नंदू जाधव, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथील ड्रोण सर्वेअर संकेत बाबर व बबलू नरळे यांनी भाग घेतला.

# वाजे विद्यालयात शनिवारी माजी विद्यार्थी सस्नेह मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील जुन्या आठवणी अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थी सस्नेह मेळावा जुने जनता विद्यालय सिन्नर शाळा तसेच आत्ताचे नामकरण झालेले नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील सिन्नर येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात शनिवारी दिनांक ८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी दिली.

तसेच या मेळाव्यासाठी हजारो विद्यार्थी उपस्थिती राहतील अशी शक्यता आहे. तरी या मेळाव्यास माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे असे आव्हान विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख, पर्यवेक्षक अशोक निंबाळकर, राम ढोली आदींसह शिक्षकांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीर उभा राहाणाऱ्या त्यागमुर्ती माता रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन युवकांनी मार्गक्रमण करावे

## नळदुर्ग शहरात विविध ठिकाणी त्यागमुर्ती रमाईला अभिवादन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यात माता रमाईने खुप मोठे योगदान दिले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र प्रयत्न करून देशासाठी बलाढ्य महान संविधान तयार केले डॉ बाबासाहेब आंबेडकर हे बाहेर देशात उच्च शिक्षणासाठी गेले आसता आपल्या मेहनतीच्या कमाईतून आपल्या पतीला देत आसतं परदेशात आसताना रात्रंदिवस प्रंपचाची काळजी केली नाही अत्यंत मनमिळाऊ सुशिल , होत्या आपल्या मुलांचं निधन झाल तरी ही देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी बाबासाहेबांना मदत करीत राहिल्या त्या महान त्यागमुर्ती माता रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून नागरीक यूवक व युवतीनी मार्गक्रमण करावे आसे प्रतिपादन तुळजाभवानी विद्यामंदीर तुळजापूर येथील मुख्याध्यापिका सुरेखा साळुंके यांनी केल्या.

नळदुर्ग येथे जिल्हा परिषद कन्या प्रशालेत माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वार्षिक स्नेह सम्मेलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळेस त्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तज्ञ शिक्षक तथा पत्रकार ड पांडुरंग पोळे , बसवेश्वर हायस्कुल जेवळी येथील नुतन प्राचार्य महादेव भोसले पत्रकार दादासाहेब बनसोडे उपस्थित होते . डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मिडीयम स्कुल चे प्रमुख मुख्य प्रवर्तक मारुती खारवे ,जी एम चौक डॉ आंबेडकर नगर भिम नगर इंदिरानगर त्यागमुर्ती माता रमाईच्या प्रतिमेचे पूजन करून पेढे व लाडु वाटत करण्यात आले अजयकुमार बागडे यांच्या कडून शालेय उपयोगी वस्तुचे वाटप करण्यात आले. प्रमोद लोंढे यांच्या कडून भारतीय संविधानाचा ग्रंथ देऊन दादासाहेब बनसोडे यांनी मान्यवरांचा सत्कार केला यावेळी रि पा ई जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे कार्याध्यक्ष

महादेव कांबळे , मधुशिला बागडे उमेश गायकवाड ,पपू कांबळे आप्पापा भांगे , पार्वती वाघमारे , मिरा थोरात , कार्तिक बनसोडे, सह अनेक नागरीक उपस्थित होते.



### थोडक्यात...

#### महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण हिसकावले

सोलापूर, (प्रतिनिधी) : महिलेच्या गळ्यातील ४८ हजार रुपये किमतीचे बारा ग्राम वजनाचे मिनी गंठण दुचाकीवर आलेल्या इसमानी हिसकावून घेऊन गेल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास सुमारास स्टेट बँक कॉलनी २ मड्डी वस्ती येथे घडली. याप्रकरणी रक्षा गोपाळ भूमकर (वय-२९,रा.डीएसबीआय कॉलनी,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन एमएच.१३.ईएम.७७७८ यावरील दोन अज्ञात इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांचा मुलगा आयाश याला जाजू क्लास करिता दुचाकीवर जात असताना वरील ठिकाणी प्रभाकर झाड यांच्या घरासमोर फिर्यादी आले असता,पाठीमागून येणाऱ्या दोन अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या गळ्यातील वरील किमतीचे सोन्याचे मिनी गंठणचा तुकडा जबरदस्तीने हिसका मारून ओढून घेऊन गेले आहेत.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महाडिक हे करीत आहेत.



## मोहा येथे त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
कळंब: सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील मोहा येथे आज दि.७/२/२०२५ रोजी मोहा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते महिलांचाही सहभाग मोठ्या प्रमाणात होता.यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष अशोक कसबे सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे, विशाल कसबे, महावीर कसबे, गणेश कसबे, राहुल कसबे, प्रवीण कसबे, आकाश कसबे,अश्रूबा नागटिळक, सौरभ मोहोळ, संकेत कसबे, कृष्ण हिरवे उपस्थित होते.

## रमाईच्या जीवनातील अनेक पैलू बार्टी संशोधनाद्वारे उलगडणार : सुनिल वारे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
पुणे/प्रतिनीधी : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षणासाठी लंडन येथे तसेच कोलंबिया विश्व विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले. बाबासाहेबांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह अशा अनेक सामाजिक चळवळी उभ्या केल्या त्यांनी मानव मुक्तीचा लढा उभा केला या सर्व लढ्यामध्ये त्याग मूर्ती रमाई या बाबासाहेबांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या होत्या म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपणाला न्याय दिला रमाईच्या त्यागामुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकर घडले. बार्टी रमाईच्या जीवनावर संशोधन करून त्यांच्या जीवनातील अनेक पैलू उलगडणार असल्याचे मत बाटी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक , पुणे येथील अभिवादन कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.




अध्यक्ष विठलदादा गायकवाड, महार रेजिमेंटचे माजी कॅप्टन बाबु पोळके, भीमशाहिर विजय कावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. महासंचालक श्री वारे म्हणाले की, बार्टीच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत साहित्यिक लेखक आदरणीय ज वि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रमाईच्या जीवनातील अनेक पैलूचे संशोधन करण्यासाठी प्रकल्प सुरू करण्यात आला असुन या प्रकल्पाद्वारे रमाईच्या जीवनातील अनेक घटनांना उजाळा मिळेल काही सुचना असल्यास श्री रामदास लोखंडे यांच्याकडे देण्यात यावे असे आव्हान त्यांनी यावेळी केले. तसेच वनंद येथिल स्मारकात बार्टीच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केल्याचेही सांगितले.

अध्यक्ष विठलदादा गायकवाड यांनी मा महासंचालक श्री वारे यांना रमाईचे पुस्तक भेट देऊन सन्मानित केले.

माता रमाईच्या पुतळ्यास मा महासंचालक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मुख्यालयात माता रमाईच्या तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा महासंचालक श्री वारे यांनी विनम्र अभिवादन केले.

तसेच त्यांनी रमाईच्या जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला.ग्रंथपाल वैशाली खांडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, दादासाहेब गिते, उमेश सोनवणे, शुभांगी पाटिल यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्री सुमेध थोरात यांनी मानले..

## अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सर्व शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी २८ फेब्रुवारी पर्यंत करावी

### तहसीलदार अजित दिवटे यांचे आवाहन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

सिंदखेडराजा तालुक्यातील प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना व अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सर्व शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी२८ फेब्रुवारी पर्यंत सर्व शिधापत्रिका धारकांनी (सत्यापन ) करणेबाबत विशेष मोहीम सुरू असून या मोहिम अंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांना आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी. २८ फेब्रुवारी पर्यंत करणे बंधनकारक असून सर्व लाभधारकानी इ केवायसी करून घेण्याचे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे आहे.

महाराष्ट्र शासन अंतर्गत तहसिल कार्यालय, सिंदखेड राजा अंतर्गत सर्व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सिंदखेड राजा तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सर्व शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी (सत्यापन ) करणेबाबत विशेष मोहीम सुरू असून या मोहिमेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांना आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. आपली शिधापत्रिका आणि आधार कार्ड घेवून दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी सर्व शिधापत्रिकाधारकांनी आपल्या सर्व कुटुंबातील सदस्यांची स्वस्त धान्य दुकानात जावून ई-केवायसी (सत्यापन) पूर्ण करून घ्यावी. जे शिधात्रिकाधारक ई- केवायसी करणार नाही, त्यांचे धान्य बंद झाल्यास अथवा अपात्र ठरल्यास स्वतः शिधात्रिकाधारक ह्यास जबाबदार राहतील. त्यामुळे पुनश्च सिंदखेड राजा तालुक्यातील सर्व शिधात्रिकाधारकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही अन्नधान्यापासून वंचित राहू नये याकरिता त्वरित आपल्या स्वस्त धान्य दुकानात जावून ई-केवायसी (सत्यापन) पूर्ण करून घ्यावे व प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे.




## पंढरपूर रेल्वे स्टेशनवर प्रवासी दिन साजरा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय ग्राहक रथसप्तमी हा दिवस राष्ट्रीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो त्यानिमित्त पंढरपूर रेल्वे स्टेशन तिळ-गुळ वाटप समारंभ आयोजित करण्यात आला अध्यक्षस्थानी रेशनचे प्रबंधक केके मिश्रा हे होते.




प्रारंभी ग्राहक पंचायतीचे आराध्य दैवत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक तालुकाध्यक्ष विना उपाध्ये यांनी केले जिल्हा संघटक दीपक इरकल यांनी प्रवासी दिन साजरा करणे मागील हेतू स्पष्ट केला. जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी किसान रेल्वे सुरू करावी अशी मागणी केली स्टेशन प्रबंधक के.के. मिश्रा यांनी रेल्वेतर्फे सुरू असलेल्या विविध कामाबद्दल सविस्तर माहिती दिली. व प्रवासी सेवेतून त्रुटी अपेक्षित सुधारणा आमच्या मार्फत पोहोचवा व त्या निश्चितपणे सोडव ण्यात येतील अशा भावना व्यक्त केल्या. ग्राहक पंचायतीचे सदस्य राजू ऐनापुरे, श्री व सौ रेखाचंद्रराव, तिकीट तपासणीस स्वच्छता दूध रेल्वे सुरक्षा बलाचे कर्मचारी रेल्वे प्रशासन तिळगुळ वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी वाणिज्य व्यवस्थापक अमोल जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतलेले आहे.

### इंदापूर तालुक्यातील ५ हजार २८१ पात्र लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी

### गोरगरिबांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण

## क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यातील ५ हजार २८१ लाभार्थ्यांच्या पक्क्या घराचे स्वप्न केले साकार



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

इंदापूर : इंदापूरचे लोकप्रतिनिधी व राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यातील गोरगरिबांच्या पक्क्या घराचे स्वप्न पंतप्रधान घरकुल योजने अंतर्गत साकार केले आहे. या अंतर्गत इंदापूर तालुक्यात ५ हजार २८१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या पक्क्या घराचे स्वप्न पाहत असलेल्या गोरगरिबां मध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे.

पुणे जिल्ह्याला दुसऱ्या टप्प्यात यावर्षी ३८ हजार ८२७ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट शासनाने दिले होते. त्यापैकी जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून ३२ हजार ११८ विक्रमी घरकुलांना मंजुरी दिली आहे यात इंदापूर तालुक्यातील सर्वाधिक ४ हजार ६०८ घरकुलांचा समावेश आहे.

**या वर्षात पहिल्या टप्प्यात १ हजार ८८ घरकुल मंजूर आहेत त्यापैकी ७४१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित केलेला आहे. तसेच पहिला व दुसरा टप्पा मिळून इंदापूर तालुक्यात ५ हजार २७५ घरकुलांना आज अखेर मंजूरी मिळालेली आहे.**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सन २०२४-२५ अंतर्गत इंदापूर तालुक्याला ५७२३ घरकुलांचे उद्दिष्ट आमदार श्री भरणे यांच्या माध्यमातून मिळाले होते. त्यापैकी श्री भरणे यांच्या माध्यमातून ५२८१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तर आधार कार्ड व तांत्रिक अडचणी संदर्भातील ४४२ घरकुलांना मंजुरी देणे अजूनही प्रलंबित आहे त्यातील पहिल्या हप्त्यात ७४१ लाभार्थ्यांना अनुदानाचा हप्ता वितरित करण्यात आलेला आहे. तर ४५४० लाभार्थ्यांना हप्ता वितरित करणे बाकी आहे.

तसेच फेज दोनच्या पहिल्या टप्प्यात १११५ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते त्यापैकी १०८८ घर मंजुरी देण्यात आलेले आहे त्यापैकी ७४१ लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

तर दुसऱ्या टप्प्यात ४६०८ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आली होती. त्यापैकी ४१९३ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे. तर आधार व तांत्रिक अडचणीची संबंधित ४१५ घरकुलांना मंजुरी देणे प्रलंबित आहे.

तसेच इंदापूर तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांनी प्रस्तावासोबत प्रामुख्याने आधार कार्ड दिलेले नाही अशा नागरिकांचे अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांच्या घरकुलांच्या मंजुऱ्या प्रलंबित आहेत. त्या प्रस्ताव सादर केलेल्या नागरिकांनी आधार कार्ड बँकेला संलग्न करावीत. स्वतःची जागा उपलब्ध असल्याची कागदपत्रे ग्रामपंचायत किवा पंचायत समितीमध्ये द्यावीत. त्यानंतर तालुक्यातील उर्वरित लाभार्थ्यांच्या घरकुलांना तात्काळ मंजुरी दिली जाणार आहे.